प्रोप्रा.गायसमुद्रे 9527407701 8459953702
एस.एम गारमेंट
शर्ट-पॅन्टचा कारखाना
पॅन्ट-शर्ट अरमानी शेरवानी सफारी
आमच्याकडे सर्व प्रकारचे ड्रेस एक तासात शिवून मिळतील
बीड रोड , न्यायालया समोर केज जि.बीड
प्रोप्रा.गायसमुद्रे मो.न.9527407701 8459953702
एक वेळ अवश्य भेट द्या

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● मंगळवार ६ ऑगस्ट २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३५५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
वादळ वार्ता या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
दैनिक वादळ वार्ता
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता * समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक ,सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भिड दैनिक
मो.न.9422660077

# बांगलादेशमध्ये सत्तापालट होताच भारतात हालचालींना वेग !

## बांगलादेश सीमेवर बीएसएफने गस्त वाढवली आहे

**बांगलादेशामधील बिघडत चाललेली राजकीय परिस्थिती आणि हिंसाचार पाहता परराष्ट्र मंत्रालयाने भारतीय नागरिकांना सूचना जारी केली आहे. त्यांनी नागरिकांना बांगलादेशात न जाण्याचे आवाहन केले आहे. एअर इंडियाने ढाकाला जाणाऱ्या विमानसेवा बंद केल्या आहेत. बांगलादेश आणि भारतादरम्यान धावणाऱ्या रेल्वे सेवेवरही याचा परिणाम झाला आहे. रेल्वे सेवा रद्द केल्यानंतर विमानसेवा देखील बंद करण्यात आली आहे. भारतातील बांगलादेश उच्चायुक्तालयाची सुरक्षा वाढवण्यात आली आहे.**

**वादळवार्ता/विशेष**

बांगलादेशमध्ये हिंसक आंदोलनानंतर शेख हसीना यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिलाय. मोठ्या संख्येने आंदोलका त्यांच्या निवासस्थानी दाखल झाल्याने त्यांना काही मिनिटातच देश सोडावा लागला आहे. शेख हसीना यांनी भारतात आश्रय घेतला आहे. त्यांचे विमान दिल्लीला लागून असलेल्या गाझियाबादमधील हिंडन एअरबेसवर उतरले आहे. या सर्व घडमोडींचा भारतात देखील परिणाम



पाहायला मिळत आहे. भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल हे शेख हसीना यांची भेट घेण्यासाठी पोहोचले होते. बांगलादेशातील प्रत्येक घडामोडीवर भारताचे लक्ष आहे. बीएसएफने भारत-बांगलादेश सीमेवर हाय अलर्ट जारी केलाय. सीमेवर बीएसएफ जवानांची गस्त वाढवण्यात आलीये. बीएसएफचे डीजी स्वतः सीमेवर पोहोचले आहेत. दुसरीकडे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली आहे.

**भारतात हालचालींना वेग** पंतप्रधानपदाचा राजीनामा दिल्यानंतर शेख हसीना यांनी भारतात आश्रय घेतल्याने भारतात देखील हालचालींना वेग आलाय. शेख हसीना यांचे विमान काही तासांपूर्वीच गाझियाबादमधील हिंडन एअरबेसवर उतरले आहे. अजित डोवाल आणि शेख हसीना यांच्यात जवळपास अर्धातास चर्चा झाली. वेस्टर्न एअर कमांडचे एअर मार्शल पंकज मोहन सिन्हा हे देखील या ठिकाणी पोहोचले आहेत.परराष्ट्र मंत्री जयशंकर यांनी पंतप्रधान मोदींना बांगलादेशमधील प्रत्येक अपडेट दिली आहे. काही मिनिटांपूर्वीच त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतलीय. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बांगलादेशातील परिस्थितीबाबत त्यांनी पंतप्रधान मोदींना माहिती दिली आहे. शेख हसीना यांचे विमान ज्या पद्धतीने भारतीय भूमीवर आले आणि बांगलादेशातील परिस्थिती यावर पंतप्रधान आणि परराष्ट्रमंत्री जयशंकर यांच्यात चर्चा झाल्याचे मानले जात आहे.



## माजलगावात सत्यशोधक महोत्सव उत्साहात साजरा
## गायिका मंजुषा शिंदे, संतोष मोरे यांच्या गायनाने श्रोते मंत्रमुग्ध

**माजलगाव/प्रतिनिधी**

शहरामध्ये युवा नेते अमोल शेरकर यांचे वतीने अण्णाभाउ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमीत्त दि. ४ ऑगस्ट रोजी मोठ्या उत्साहात सत्यशोधक महोत्सव महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयात साजरा करण्यात आला. यामध्ये महाराष्ट्रातील सुप्रसिध्द गायिका मंजुषा शिंदे तसेच गायक संतोष मोरे यांचा परिवर्तनातील वादळ वारा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांच्या हस्ते करण्यात आले तर प्रमुख उपस्थितीत जयसिंग सोळंके, एकनाथ मस्के, राहुल लंगडे, रोहन घाडगे, शंतनु सोळंके, अविनाश जावळे, राकेश साळवे, पवनराजे देशमुख यांची उपस्थिती होती. यावेळी गायिका मंजुषा शिंदे, संतोष मोरे यांनी अण्णाभाउ साठे यांच्या जिवनचरित्रावरील व आंबेडकरवादी विवीध गीत सादर करत श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले तर सद्दाम शेख यांच्या मिमीक्रीमुळे श्रोते भारावुन गेले. कार्यक्रमास शहरासह तालुका परिसरातील बहुजन चळवळीतील हजारो जाणकार श्रोत्यांनी उपस्थिती लावली होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी केतन मिसाळ, हनुमंत तुपसौंदर, विक्रम वाघमारे, दिपक शेरकर, राहुल हिवाळे, विकास जाधव, विजय शेरकर, विष्णु कांबळे, बळी वैराळे, जगदीश थोरात, नितीन गायकवाड, मधुर ताटे, सनी शेरकर, बबलु शेरकर, शंकर आलाट, बालाजी आलाट, गणेश आलाट, सुनिल अवचार, बाळु अवचार, यांनी परिश्रम घेतले.

## सुनील प्रभू ,सुषमा अंधारे यांच्या उपस्थितीत गेवराईत आज भगवा सप्ताहचे आयोजन
## बहुसंख्येने उपस्थित रहा-बदामराव पंडित युधाजित पंडितांनी घेतली बैठक

**गेवराई/प्रतिनिधी**

येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उद्या दिनांक ७ ऑगस्ट २०२४ रोजी गेवराईत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख आ सुनील प्रभू, शिवसेना उपनेत्या सुषमाताई अंधारे यांच्या प्रमुख उपस्थितीत भगवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यास गेवराई विधानसभा मतदारसंघातील शिवसैनिक व पदाधिकाऱ्यांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केले आहे. दरम्यान शिवसेना जिल्हा समन्वयक तथा जिल्हा परिषदचे माजी सभापती योधाजित पंडित यांनी शिवसैनिकांची बैठक घेतली आहे.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशावरून राज्यभर प्रत्येक मतदारसंघात शिवसैनिकांचा भगवा सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर उद्या दिनांक ७ ऑगस्ट २०२४ रोजी गेवराई येथील शिवसेना कार्यालया जवळ सकाळी १० वाजता शिवसैनिकांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख शिवसेना नेते आमदार सुनील प्रभू, शिवसेना उपनेते सुषमाताई अंधारे, माजी आमदार सुनील धांडे हे मार्गदर्शन करणार आहेत तर जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, गेवराई तालुका संपर्कप्रमुख बावकर आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या मेळाव्यास गेवराई विधानसभा मतदारसंघातील शिवसैनिकांनी बहुसंख्येने उपस्थित



राहावे असे आवाहन माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, शिवसेना तालुकाप्रमुख अजय दाभाडे, युवा सेना तालुकाप्रमुख गोविंद दाभाडे यांनी केले आहे.

भगवा सप्ताह निमित्त आयोजित हा मेळावा यशस्वी करण्यासाठी गेवराई विधानसभा मतदारसंघातील शिवसैनिक व पदाधिकाऱ्यांची शिवसेना जिल्हा समन्वयक तथा जिल्हा परिषदचे माजी सभापती युधाजित पंडित यांनी दिनांक ५ ऑगस्ट रोजी मतदारसंघातील युवा शिवसैनिकांची बैठक घेतली. गेवराई मतदार संघावर शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी सर्वांनी एक जीवाने एकत्र येऊन काम करावे, तसेच उद्या होणाऱ्या मेळाव्याला सर्वांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन केले. यावेळी गेवराई तालुका सरपंच संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी कालिदास नवले यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा युधाजीत पंडित यांनी सत्कार केला. तर स्वर्गीय बापूराव चव्हाण यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या बैठकीस युधाजित पंडित यांच्यासह युवानेते रोहित पंडित, युवानेते यशराज पंडित, माजी जि प सदस्य शामराव राठोड, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष कालिदास नवले, माजी उपनगराध्यक्ष अमोल करांडे, उपजिल्हाप्रमुख बबलू खराडे, युवा सेना उपजिल्हाप्रमुख शेख सिराज, युवा सेना तालुकाप्रमुख गोविंद दाभाडे, सुभाष शिंदे, शिवाजीराव चव्हाण,विश्वंभर सोनवणे, तय्यब पठाण, सतीश सपकाळ, भैय्यासाहेब नाईकवाडे, राजेश तळेकर, बदाम पौळ, तुकाराम तळतकर, किरण आहेर, मुकुंद बाबर, नवनाथ पारे, महेश आरबड, जगदीश मस्के, फत्तू मामु, वर्मा, अविनाश चव्हाण, पिकाजी राठोड, भारत मडके, तुळशीराम गलधर, धर्मराज आहेर, पप्पू कोठेकर, भाऊसाहेब शिंदे, चंद्रसेन जाधव, भैय्यासाहेब मस्के, विलास शिंदे, विठ्ठल रूचके, सुरेश नागरे, शेख रफिक, माऊली मुळक, अनिस मौलाना, पप्पू कोठेकर, वैभव शिनगारे, बंडू पटाईत, प्रभाकर गवारे, राजू नाडे, अशोक नाईकनवरे आबा उबाळे, सुनील कांडेकर राजाभाऊ राऊत, काशिनाथ आडागळे, पंडित राऊत, काशिनाथ उबाळे, अशोक तौर, शेख नवीद आदींसह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.







(बीड प्रतिनिधी)वरवटी/धानोरा रोड नरसोबा नगरच्या रेल्वे ब्रीजला संघर्ष योध्दा मनोज दादा जरांगे पाटील रेल्वे ब्रीज असं नाव देण्यात आलं आहे..

## आ.प्रकाशदादा सोळंके यांनी खा.शरदचंद्र पवार यांना शिकवू नये
## तुम्ही पराभवाच्या भितीने थांबलात-प्रा.ईश्वर मुंडे यांचा सोळंकेवर पलटवार

**माजलगाव/प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात, मी खा.शरदचंद्र पवार यांचे बोट धरून राजकारणात आलो. खा.शरदचंद्र पवार हे माझे गुरू आहेत.त्या खा.शरदचंद्र पवार यांना आ.प्रकाशदादा सोळंके यांनी सल्ला शिकवू नये. माझे वय झाले म्हणून राजकारणातून बाजूला होऊन नवीन नेतृत्व युवक पुतण्याला संधी दिली आहे.



अशीच संधी शरद पवारांनी दिली आसती तर घर फुटले नसते असे माजलगावचे आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी म्हटले आहे.

या वर बोलताना राष्ट्रवादी कॅांग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सेवा निवृत्त अधिकारी कर्मचारी सेल चे राज्य प्रमुख प्रा.ईश्वर मुंडे म्हणाले की आ.प्रकाशदादा सोळंके तुम्ही वय झाले म्हणून थांबला नाहीत तर आगामी विधानसभा निवडणूकीत आपला पराभव दिसू लागल्याने स्वत: ला वाचवून पुतण्याला बळीचा बकरा करत आहात.

सोळंके कुटुंबाचे नाव एक नैतिक राजकीय कुटुंब म्हणून घेतले जाते.आम्ही ही त्यांचा आदर करतोत परंतू खा.शरदचंद्र पवार साहेबांवरील टिका सहन केली जाणार नाही असे ही प्रा.



ईश्वर मुंडे म्हणाले.

# १३ वर्षीय अरविंद खोपे खुनाचा सीबीआय मार्फत तपास करुन दोषींना कडक शासन करावे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाची मुख्यमंत्र्याकडे निवेदनाद्वारे मागणी

**परळी / प्रतिनिधी**

परळी (वार्ताहर)परळी तालुक्यातील पांगरी गावचा 13 वर्षीय अरविंद राजेभाऊ खोपे या विद्यार्थ्यांचा लातूर येथे खून करण्यात आला असून या सर्व प्रकरणाची सीबीआय चौकशी करून दोषींना कडक शासन करावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने तहसीलदार यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. अरविंद हा विद्यार्थी लातूर येथील विवेकानंद शाळेत शिक्षणासाठी होता त्या संस्थेतील शिक्षक श्री टेकाळे आणि सूर्यवंशी या दोन शिक्षकांनी मिळून अरविंद ला जबर मारहाण करून त्याचा खून करण्यात आल्याची शंका अरविंदच्या पालकांना असून अरविंद ची आई व पालक यांना शिक्षकांनी अरविंद भिंतीवरून उडी मारून पळून गेला असल्याची माहिती दिली त्यानंतर रात्री तीन वाजेपर्यंत त्यांनी बस स्टॅन्ड रेल्वे स्टेशन इतर ठिकाणी शोधाशोध केली पण कुठेही तो दिसून आला नाही. रात्री 3 च्या सुमारास परत शाळेत गेले असता श्री टेकाळे सर्व सूर्यवंशी सर इतर काही जण अरविंदला कापडात गुंडाळून बाजूच्या जंगलात फेकून देण्याच्या तयारीत होते. सदरील घटना ही खूप गंभीर असून या घटनेची सीबीआय चौकशी करण्यात यावी. तसेच या घटनेच्या दरम्यान काही मागण्या असून त्या पुढील प्रमाणे आहेत. १) अरविंद खोपे यांच्या मृत्यू जबाबदार असणारे टेकाळे सर व सूर्यवंशी यांना जामीन देऊ नये. २) अरविंदच्या मृत्यूस जबाबदार असणारे इतर सहशिक्षक संस्था चालक



व तेथील निरीक्षक कर्मचारी यांची चौकशी करून या गुन्ह्यांमध्ये ज्यांचा समावेश आहे त्यांना अटक करावी .३) अरविंद हा मुलगा बौद्ध समाजातील असल्यामुळे सदर खुणातील आरोपीला अनुसूचित जातीचा अन्याय प्रतिबंध कलम लावण्यात यावे. ४) सदरील घटनेचा तपास सीबीआय च्या मार्फत करण्यात यावा. ५) अरविंद या विद्यार्थ्याला मारहाण करून मृत्यू जबाबदार असणाऱ्या शाळेचा परवाना रद्द करण्यात यावा. तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी करून आरोपींना कडक दंड व पीडित कुटुंबाला न्याय देण्यात यावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने निवेदनाद्वारे केली आहे. याप्रसंगी तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज ,शहराध्यक्ष अॅड जीवनराव देशमुख, तालुका कार्याध्यक्ष रमेश ढाकणे, महिला आघाडी शहराध्यक्ष ऍड कल्पनाताई देशमुख, कामगार सेल जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले, युवक तालुकाध्यक्ष शंकर शेजुळ, युवक उपाध्यक्ष वृक्षराज काळे, युवक तालुका उपाध्यक्ष गोविंद देशमुख ,भटक्या विमुक्त जमाती सेल तालुकाध्यक्ष गणेश देवकाते, वारकरी परिषद सेल तालुकाध्यक्ष व्यंकट महाराज आगलावे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा दलित चळवळीतील ज्येष्ठ नेते मुक्ताराम गवळी,विनायक काचगुंडे, गोविंद काळे यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# उजनी धरणातून १ लाख २५ हजार तर वीरमधून३३ हजार ६०९क्युसेकचा विसर्ग नदीकाठच्या नागरिकांनी सतर्कता बाळगावी

**पंढरपूर/प्रतिनिधी**

पंढरपूर उजनी धरण व वीर पाणलोट क्षेत्रात सतत सुरु असलेल्या पावसामूळे धरणे शंभर टक्के भरली आहेत. त्यामुळे धरणांमधून मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरु आहे. उजनी धरणातून सायं.५.०० वाजता १ लाख २५ हजार क्युसेकचा तर वीरधरणातून ३३ हजार ६०९ क्युसेकचा विसर्ग सुरु आहे. संगम येथून दुपारी ३. ०० वाजेपर्यंत १ लाख ३७ हजार ८६० क्युसेक पाणी भीमा नदीत मिसळत असल्याने भीमा नदी पात्राच्या पाणी पातळीत वाढ होत आहे. भीमा नदी पात्रातील वाढती पाणी पातळी लक्षात घेता नदीकाठच्या नागरिकांनी सतर्कता बाळगावी असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

मागील काही दिवसांपासून उजनी व वीर धरण क्षेत्र परिसरात सततच्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरु आहे. नदी पात्रातील पाणी पातळीत वाढ झाल्याने दगडी पूल तसेच नदीवरील पिराची कुरोली, गुरसाळे, पंढरपूर, गोपाळपूर,मुंढेवाडी, पूळूज हे ६ बंधारे पाण्याखाली गेले आहेत. चंद्रभागा नदी पात्रात सध्या ५९ हजार २२२ क्युसेक पाणी वहात आहे. संगम येथून येणाऱ्या पाण्यामुळे चंद्रभागा नदी पात्रात रात्री ८:०० वाजले नंतर सुमारे १ लाख ३७ हजार क्युसेकने पाणी वाहणार आहे.

भीमा नदीवरील पंढरपूर तालूक्यातील पिराची कुरोली, गुरसाळे, पंढरपूर, गोपाळपूर,मुंढेवाडी, पूळूज हे कोल्हापूर पध्दतीचे बंधारे पाण्याखाली गेल्याने बंधाऱ्यावरुन होणारी वाहतूक बंद राहणार आहे.चंद्रभागा दुथडी भरून वाहत आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावातील नागरिकांना सतर्कता बाळगावी. नदीपात्रात कोणीही उतरु नये. स्थानिक ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक, तलाठी, मंडलअधिकारी, पोलीस पाटील पुरस्थितीवर नियंत्रण ठेवून आहेत. नागरिकांनी काळजी घ्यावी. प्रशासनास सहकार्य करावे. असे आवाहनही उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

भीमा नदीपात्रात १ लाख ३० हजार क्युसेक विसर्ग आल्यावर ( ४४३.६०० पाणी पातळी मीटर) नदीकाठी असणाऱ्या व्यास नारायण झोपडपट्टीमध्ये पाणी शिरते. १ लाख ६० हजार क्युसेक विसर्ग आल्यावर ( ४४४.५०० पाणी पातळी मीटर) गोपाळपूर येथील नवीन पुलावर पाणी येते. तर २ लाख क्युसेक विसर्ग आल्यावर ( ४४५.५०० पाणी पातळी मीटर) संतपेठ झोपडपट्टीतील सखल भागात पाणी येते. तर २ लाख २५ हजार क्युसेक विसर्ग आल्यावर (४४६.३०० पाणी पातळी मीटर) गोविंदपुरा येथे पाणी येते. ३ क्युसेक विसर्ग आल्यावर (४४७.८५० पाणी पातळी मीटर) कबीर मठ पायथा, जुनी नगरपालिका इमारत या ठिकाणी सुमारे १ ते १. ५ फुट पाणी येते. ३ लाख २५ हजार क्युसेक विसर्ग आल्यावर ( ४४८.२०० पाणी पातळी मीटर) दत्तघाट, माहेश्वरी धर्मशाळा, महाव्दार घाट, कालिका मंदिर चौक या भागात सुमारे १ फुट पाणी येण्यास सुरुवात होते. असे भीमा पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता एस.के हरसुरे यांनी सांगितले तसेच वाढता विसर्ग पाहता नागरिकांनी सतर्कता बाळगावी असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# जिल्हास्तरीय लोकशाही दिनात एकुण 7 अर्ज प्राप्त

बीड, दि. 5 , : जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये लोकशाही दिनाचे 07 अर्ज प्राप्त झाले. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात लोकशाही दिन संपन्न झाला. यावेळी महसूल, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी, जिल्हा पोलीस मुख्यालय, जिल्हा परिषद, पाटबंधारे विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग, परिवहन विभाग, सहकार विभाग, कृषी विभाग व पाणी पुरवठा विभाग, समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाकडून लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे होती, ते संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# बीड विधानसभेच्या उमेदवारीचे शेकाप पक्षाचे सरचिटणीस भाई जयंत पाटील यांचे संकेत

## शेतकरी कामगारपक्षाच्या केंद्रीय कमिटीवर भाई बाळासाहेब घुमरे यांची निवड

**बीड (प्रतिनिधी)**-भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे 19 वे अधिवेशन पंढरपुर येथे भाई गणपतराव देशमुख नगरीमध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले.या अधिवेशनामध्ये शेतकरी, कामगार, कष्टकरी, दिन-दलीत यांच्या प्रश्नावर सातत्याने विद्यार्थीदशेपासून आंदोलन करणारे व चळवळीत सहभागी असणारे निष्ठावंत कार्यकर्ते माजी नगरसेवक तथा माजी जिल्हा चिटणीस भाई बाळासाहेब घुमरे यांची केंद्रीय कमिटीवर सदस्य म्हणून निवड करण्यात आली तसेच बीड विधानसभेच्या उमेदवारीचे संकेतही दिल्याचे दिसून येत आहे. याबाबत वृत्त असे की शेकाप पक्षाचे अधिवेशन यापर्षी पंढरपुर येथे संपन्न झाले यावेळी भाई बाळासाहेब घुमरे यांची केंद्रीय कमिटीवर निवड झाली तसेच शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील हे पक्षाने उमेदवारी दिल्यास निवडणुक लढवण्याचे संकेत दिले आहेत. भाई बाळासाहेब घुमरे यांनी विद्यार्थी दशेपासून आजतागायत लाल बावट्याच्या झेंड्याखाली आजतागायत एकनिष्ठतेने काम केले आहे आणि हरहुन्नरी व्यक्तीमत्व म्हणून बाळासाहेब घुमरेंची ओळख आह

# मनोज जरांगे पाटील यांचा ७ ऑगस्ट पासून होणा-या दौ-याचा समारोप १३ तारखेला नाशिक मध्ये शांतता फेरीने होणार

**नाशिक/प्रतिनिधी**

मनोज रंगे पाटील यांचा ७ ऑगस्ट पासून राज्यातील सोलापूर, सांगली, कोल्हापूर, आदी भागात दौरा होणार असून या दौऱ्याचा समारोप १३ तारखेला नाशिक मध्ये शांतता फेरीने होणार आहे. या फेरीमध्ये लाखो मराठा समुदाय सहभागी होणार असल्याचे मराठा सकल मराठा समाजा च्या वतीने सांगण्यात आले . या माध्यमातून ओबीसी नेते छगन भुजबळ यांच्या जिल्ह्यात एक प्रकारे शक्ती प्रदर्शन केले जाणार आहे. शहर सकल मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने नांदूर नाका येथील साईलीला लॉन्स मध्ये नुकतीच आढावा बैठक पार पडली .यावेळी विविध ठराव मंजूर करण्यात आले . त्यामध्ये जरांगे पाटील यांच्या राज्यस्तरीय दौऱ्याच्या समारोपानिमित्त शहरात निघणाऱ्या शांतता फेरीत मराठा समाजाला कुटुंबासह सहभागी करण्याचे




नियोजन या ठरावात करण्यात आले. १३ ऑगस्ट रोजी होणारी जरांगे पाटील यांची शांतता फेरी, ही तपोवन येथून सुरू होईल, तसेच पंचवटी, मालेगाव स्टॅन्ड , रविवार कारंजा ,सांगली बँक सिग्नल, मेहर चौक, मार्गे शिवतीर्थ अशा प्रकारे या फेरीचा मार्ग असणार आहे. या ठिकाणी जरांगे पाटील हे उपस्थितांना मार्गदर्शन करतील. तालुकानिहाय बैठकीचे आयोजन करून शांतता फेरीचे काटेकोरपणे नियोजन केले जाणार आहे. समाजाच्या नावाने समाज माध्यमात कुठलीही दुपडी निर्माण होईल असे संदेश कोणीही टाकता कामा नये , असा ठराव बैठकीत करण्यात आलेला आहे. विशेष म्हणजे या बैठकीत सकल मराठा क्रांतीमोर्चा नाशिक जिल्ह्याच्या वतीने शरद पवार यांच्या घरी जाऊन १९९४ मधील शासकीय अध्यादेशाबाबत जाब विचारण्याचे ठरले आहे . तसेच तालुका निहाय बैठकांचे आयोजन करून शांतता फेरीचे नियोजन फेरीसाठी जिल्ह्याच्या वतीने एक समिती असावी, आदी ठराव करण्यात आले. मराठा क्रांती मोर्चाचे करण गायकर, ऍड. शिवाजी सहाने, विलास पांगारकर, नानासाहेब बच्छाव, बंटी भागवत , आदींनी ठराव मांडले. जिल्हा सकल मराठा समाज सर्व तालुका व शहर एकत्रित बैठक सोमवारी दुपारी एक वाजता साईलिला लॉन्स या ठिकाणी झाली. त्या बैठकीमध्ये १३ तारखेच्या नियोजना संदर्भात समित्यांची स्थापना केली आहे.

# शिखर शिंगणापूर येथील महादेवाच्या दर्शनासाठी लांबच लांब रांगा हजारो भाविकांनी घेतले दर्शन

**माण/प्रतिनिधी**

सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील शिखर शिंगणापूर महादेव दर्शनासाठी पहाटेपासून भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या ७१ वर्षानंतर श्रावण महिन्याची सुरुवात ही श्रावण सोमवार आणि झाली हा दुर्मिळ योग व श्रावण सोमवारची सुरुवात अठरा वर्षाच्या नंतर सोमवार श्रावण महिन्याच्या सोमवारची सुरुवात झाली यामुळे हा योग विशेष असल्याने शिखर शिंगणापूर येथील शंभू महादेव( मोठा महादेव) म्हणून



महाराष्ट्र आंध्रा तेलंगणा सह पर राज्यातून लाखो भाविक वर्षभरात शंभू महादेवाच्या दर्शनासाठी येऊन अभिषेक पूजा आरती करून आपले जीवन कृतार्थ करतात आज दिनांक पाच ऑगस्ट रोजी पहाटेपासूनच शंभू महादेवाच्या दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या हर हर महादेव एक बार शंभूच्या नावानं हार बोला ओम नमः शिवाय असा जयघोष ऐकायला मिळत होता अतिशय मनोभावे भाविकांनी दर्शन घेत होते तर अभिषेकासाठी वेगळी रांग व दर्शनासाठी वेगळी रांग अशा रांगा लावण्यात आल्या होत्या तसं बघितलं तर शंभू महादेवाच्या दर्शनासाठी वर्षभर भाविक दर्शनासाठी परराज्यातून येत असतात व शंभू महादेवाचे दर्शन घेऊन करतात होतात अतिशय प्राचीन असलेल्या शिखर शिंगणापूर महादेवाची ख्याती आहे नवसाला पावणारा शंभू महादेव म्हणूनही या महादेवाकडे पाहिले जाते. आज श्रावण समोराच्या निमित्ताने भाविक दर्शनासाठी मोठ्या श्रद्धेने दर्शन घेत होते परिसर अगदी भाविकांनी फुलून गेला होता सातारा न्यूज पवार शिंगणापूरकर

# मुख्यमंत्री शिंदेंकडून पूरस्थितीचा आढावा; पुरग्रस्तांना दिलं 'हे' आश्वासन



**पुणे/प्रतिनिधी पुणे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून पूरस्थितीचा आढावा घेण्यात आला. यावेळी त्यांनी नागरिकांशी संवाद साधला. मुख्यमंत्री म्हणाले, तात्पुरती मदत गरजेची होती. परंतु पुराची टांगती तलवार लोकांच्या डोक्यावरून कायमस्वरूपी काढून टाकणे असा माझा विचार आहे. कितीही पुर आला किंवा पाऊस पडला तरी इथं पाणी येता कामा नये. आपल्या मालमत्तेचं, वस्तूंचं नुकसान होता कामा नये. हे सर्वसामान्यांचं सरकार आहे म्हणून मी तुम्हाला भेटायला आलेलो आहे. लाडक्या बहीणींनी राख्या बांधल्या म्हणून माझी जबाबदारी वाढलेली आहे.**

# प्रकाशदादा,तुम्ही उमेदवारीचा वारसा ठरवू शकता;आमदार मात्र आम्हीच ठरवू!–बाबुराव पोटभरे.

**माजलगाव प्रतिनिधी**

प्रकाशदादा,तुम्ही जनतेला गृहीत धरून विधानसभेत घरातील उमेदवारीचा वारसा जाहीर करू शकता;परंतु कोणाला पाडायचे आणि कोणाला आमदार करायचे हे मात्र आम्हीच ठरवणार आहोत.हे मात्र लक्षात असू द्या.कारण माजलगाव मतदार संघ हा कोणाची जागीर नाही.त्यामुळे कोणीही कोणाला गृहीत धरू नये. कोणाचीही उमेदवारी आमच्यावर लादू नये.अशा तीव्र शब्दात घनाघात करत बाबुराव पोटभरे यांनी आ.सोळंकेंकडून मतदार संघावर पुतण्या जयसिंग सोळंकेंच्या रूपाने लादल्या गेलेल्या घराणेशाहीच्या निर्णयावर हल्लाबोल केला. आ.सोळंके यांनी सुरू केलेल्या संपर्क दौऱ्यात पुतणे जयसिंग सोळंके यांच्या संभाव्य उमेदवारीला हिरवा कंदील दिला आहे.या निर्णयाच्या विरोधात बहुजन विकास मोर्च्याचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी तीव्र शब्दात आक्षेप घेतला आहे.यावेळी त्यांनी प्रकाश सोळंके यांना खडेबोल सुनावताना म्हटले आहे की,तुम्हाला आमदार करण्यात पोटभरेंचा मोठा वाटा तुम्ही मान्य करता. पोटभरेंमुळे मी निवडून आलो असं जाहीर सांगत सुटता.सग्यासोयऱ्यांनी सोडून गेलेल्या अडचणीच्या काळात पोटभरेंनी सांभाळल्याची ग्वाही देता. आणि ऐन वेळी मात्र घरातला उमेदवार जाहीर करता हे कृतघ्नतेचे लक्षण आहे. हा स्वार्थी निर्णय म्हणजे स्वतःच्या घरातच तुंबड्या भरण्याचा उद्योग आहे. सहकारी मित्रांचा विश्वासघात आहे. हा आत्मघाती निर्णय असून यावर सोळंकेनी आत्मपरीक्षण करण्याचा सल्लाही त्यांनी यावेळी दिला.तर ज्या समाजाच्या जिवावर तुम्ही मोठे झालात त्या समाजाने तुमच्या व पुतण्याच्या घरावर हल्ला केला होता. त्यामुळे त्या समाजात तुमची काही इज्जत आहे.असेही ते यावेळी म्हणाले.दरम्यान बहुजन समाजाने चार टर्म तुम्हाला आमदार केले आहे.या समाजातून कोणी आमदार होण्यास तुम्हाला पात्र वाटत नाहीत का?असा सवालही त्यांनी यावेळी उपस्थित केला आहे. बहुजन समाज हिताच्या दृष्टीने ना.धनंजय मुंडे यांच्या मध्यस्थीने आम्ही तुमच्या सोबत होतो.असा खुलासा



करत,तुम्हाला आमदार करण्यासाठी आम्ही जिवाचं रान केलं आहे.तुम्ही मात्र घराणेशाही आमच्यावर लादत आहात.हे चालणार नाही.कोणाला आमदार करायचे हे आम्ही ठरवू.असा निर्वाणीचा इशाराही त्यांनी यावेळी दिला आहे.दरम्यान जयसिंग सोळंके यांच्या संभाव्य उमेदवारीवर मतदार संघातील लोकनेते असणाऱ्या बाबुराव पोटभरे या आ.सोळंकेंच्या परममित्राचा त्यांना घरचा हा घनाघाती आहेर मानला जात आहे.याचे परिणाम आ. सोळंकेंना येत्या काळात परवडतील का?हे पाहणेही या निमित्ताने औतुक्याचे राहणार आहे.

# आष्टी तालुक्यातील कडा येथे अन्न व औषध आणि पोलीस प्रशासनाने १३३६८ किलो भेसळ दुधाची चोरी पकडली

## पालकमंत्री, छत्रपती संभाजी नगर आणि नाशिक विभागीय आयुक्त यांच्या मार्गदर्शनात जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार कारवाई

**बीड/प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यामधील कडा येथे एका गोदामात भेसळयुक्त दूध तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या १३३६८ किलो चा साठा धाड टाकून जप्त करण्यात आला आहे. या मालाची किंमत ११ लाख ८५ हजार ६८ रूपये होती. ही कारवाई जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनात, तसेच छत्रपती संभाजी नगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे आणि नाशिक विभागाचे विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या आदेशाने राबविण्यात आली. मागील तीन दिवसांपासून याबाबत



गोपनीय पद्धतीने मोहीम राबविण्यात आली होती.या अंतर्गत बीड, अहमदनगर आणि धाराशिव येथे आज पहाटे धाड टाकून कार्यवाही करण्यात आली आहे. बीड-अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील साईदत्त एंटरप्राययजेस नावाचे दुकान जवळच पत्र्याचे शेडमध्ये असलेल्या गोदामात भेसळयुक्त दुध तयार करण्यात येत होते. या ठिकाणी दूध तयार करण्यासाठी १३३६८किलो भेसळ जप्त झाले. हे काम बऱ्याच दिवसापासून सुरू असल्याचे धाड टाकताना लक्षात आले. ही धाड अन्न सुरक्षा प्रशासन व पोलिसांनी जिल्हाधिकारी श्री पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी सकाळी केली. या धाडीमध्ये एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले. अंबादास पांडुरंग चौधरी यांचे हे गोदाम होते.

गोपनिय माहितीच्या आधारे अन्न व नागरी पुरवठा आणि पोलीस प्रशासनाने रविवारी पहाटे या ठिकाणी धाड टाकली. गोडाऊनची पाहणी केली असता भेसळयुक्त दुधाची निर्मिती करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पावडरचा मोठा साठा आढळून आला. ६ लाख ८७ हजार ६७२ रुपयांची पोटॅशियम हायड्रॉक्साइड फ्लेक्स, कॉस्टिक पोटॅशियम फ्लेक्स, ट्राय सोडियम सिक्रेट, कॉस्टिक सोडा फ्लेक्स ही भेसळ ६९४२ किलो सापडली. गोदामात अंबादास पांडुरंग चौधरी यांना अनुराधा भोसले यांनी सांगीतले भेसळकारी अन्न पदार्थांचा वापर हा संकलित केलेल्या दुधामध्ये वापर करीत असल्याचे कबुली दिली. संबधित गोदामाला अन्न व औषध प्रशासन श्री देवरे आणि श्री कांबळे यांनी पुढील आदेशापर्यंत सील करण्यात आली. ही सर्व कार्यवाही अन्न सुरक्षा अधिकारी सं. कृ. कांबळे, विक्रांत हिंगे, सहायक पोलिस निरीक्षक यांनी जिल्हाधिकारी यांच्या आदेशावरून ही कार्यवाही केली.

# बीड जिल्ह्यात ६,राज्यात २०० पेक्षा जास्त जागा लढवणार प्रा. टी.पी. मुंडे त्यांचा एल्गार

**बीड/प्रतिनिधी**

शासकीय विश्रामगृह बीड येथे ओबीसी समाजातील प्रमुख कार्यकर्ते पदाधिकारी व प्रतिष्ठित ज्येष्ठ नागरिकांची बैठक तसेच पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या पत्रकार परिषद तसेच बैठकीचे आयोजन बीड विधानसभा मतदारसंघाचे प्रमुख व लोकप्रिय समाजसेवक नितीन जायभाये यांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी पत्रकार बांधवांच्या सोबत झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये ओबीसी बहुजन पार्टी चे ज्येष्ठ नेते प्रा. टी.पी. मुंडे नी पत्रकारांच्या समोर ओबीसी बहुजन पार्टीची भूमिका स्पष्ट केली. यावेळी पत्रकारांच्या



प्रश्नांना उत्तरे देताना बीड जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघाच्या सहाही जागा आणी महाराष्ट्रातील 288 पैकी 200 पेक्षा जास्त जागा ओबीसी बहुजन पार्टी लढवणार अशी पक्षाने घेतलेली भूमिका स्पष्ट केली. उरलेल्या जागांची चाचपणी व दौरे चालू आहेत हे स्पष्ट केले. सकल ओबीसी समाज आता एकजूट आणि जागृत झाला आहे व ओबीसी समाजाचे सर्वाधिक संख्याबळ लक्षात घेता महाराष्ट्राच्या विधानसभेवर फक्त सकल ओबीसी समाजाचा झेंडा फडकणार व महाराष्ट्र राज्यामध्ये ओबीसी समाजच सत्तेत येणार असा ठाम विश्वास व्यक्त केला , व महाराष्ट्रामध्ये सकल ओबीसी समाजाची सत्ता आणणार आणि प्राण गेला तरी चालेल पण मागे हटणार नाही,असा निर्धार व्यक्त केला. त्याचबरोबर या देशात आणि महाराष्ट्रामध्ये विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान वाचविणे आणि संविधानाने दिलेल्या ओबीसी समाजाच्या हक्कांचे रक्षण करणे ही काळाची मोठी गरज बनली आहे. हे ही स्पष्ट केले. यावेळी या बैठकीला ॲड. अनिल बारगजे, डॉ संदीप आंधळे, ओबीसीचे नेते समाजसेवक तथा उद्योजक दिनेश दादा मोंढेकर,पक्षाचे सचिव रफिकभाई कुरेशी , फैयाज सय्यद इक्बाल भाई सर्व पदाधिकारी प्रमुख कार्यकर्ते आणि जेष्ठ नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

### इतर मागास व विशेष मागास प्रवर्गातीलपरदेशी शिष्यवृत्तीस मुदतवाढ

बीड, दि. 5,: जिल्हयातील विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील मुलामुलींना परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना सन 2024- 25 साठी विद्यार्थ्यांना दि. 15 जून 2024 रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

सदर योजनेस जाहिरातीमध्ये शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्याची मुदत दि. 30 जून 2024 रोजी पर्यंत देण्यात आली होती. तथापी सदर योजनेस मिळालेला प्रतीसाद विचारात घेता दि. 15 ऑगस्ट 2024 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तरी परदेशी शिक्षण घेणा-या इच्छुक विद्यार्थी यांनी संचालक मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे येथे अर्ज सादर करुन शिष्यवृत्तीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयाचे संचालक, एस.एन. मेश्राम यांनी केले आहे.

### श्रावण महिन्यात एसटी संगे तीर्थाटन: उद्यापासून प्रारंभ

**छ.संभाजीनग रप्रतिनिधी** राज्यातील एसटी महामंडळाच्या विविध आगारांच्या माध्यमातून श्रावण महिन्यानिमित्त तीर्थक्षेत्री जाण्यासाठी 'श्रावणात एसटी संगे तीर्थाटन' हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात येत आहे. यामाध्यमातून ज्येष्ठ नागरिक, महिला यांना मोफत आणि माफक दरात तीर्थाटनाचा आनंद घेता येणार असून महामंडळाने प्रवाशांनी या उपक्रमात जास्तीत जास्त फायदा घ्यावा असे आवाहन केले आहे. श्रावण महिन्यामध्ये अनेक ठिकाणी धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असते. त्या अनुषंगाने बहुतांश नागरिक कुटुंबासह तीर्थक्षेत्राला जाण्याचे नियोजन करतात. यासाठी एसटीने 'श्रावणात एसटी संगे तीर्थाटन' हा अभिनव उपक्रम सुरु केला आहे.एसटीच्या प्रत्येक आगारातून श्रावण महिन्यात एकदिवसीय अथवा एक मुक्कामी धार्मिक सहलीचे आयोजन करण्यात येत असून त्यामध्ये सर्व प्रकारच्या सवलती दिल्या जात आहेत. अमृतमहोत्सवी ज्येष्ठांना मोफत तर ज्येष्ठ नागरिक व महिलांना तसेच १२ वर्षाच्या आतील मुलाना अर्धे तिकिट आकारण्यात येते. गावातील महिला बचत गट, ज्येष्ठ नागरिक संघ, विविध सेवाभावी संस्था यांच्या पुढाकाराने अशाप्रकारे सांघिक सहलीचे आयोजन केले जाते. त्र्यंबकेश्वर, भीमाशंकर, मारलेश्वर अशा तीर्थक्षेत्र बरोबरच अष्टविनायक, दर गुरुवारी नृसिंहवाडी, औदुंबर दर शनिवारी मारुती दर्शन अशा धार्मिक सहलीचे आयोजन केले जाते.सवलतीमुळे माफक दरात तीर्थाटन करण्याचा आनंद सामान्यांना मिळतानाच एसटीच्या प्रवासी संख्येत वाढ होण्यास मदत होणार आहे. राज्यातील ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, महिलांना प्रवासात पन्नास टक्के सवलत असे निर्णय राज्य शासनाने घेतले आहे. एसटीकडे प्रवाशांचा ओघ वाढतानाच कर्मचाऱ्यांनी चांगली सेवा आणि अभिनव उपक्रमांमुळे एसटीच्या उत्पन्नात भर पडेल अशी कामगिरी करण्याचे आवाहन महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी केले आहे.

# तांबा राजुरी येथे मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण व रक्तदान शिबिर संपन्न

**पाटोदा: प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मराठा संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण व रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात आली होती.

पाटोदा तालुक्यातील तांबाराजुरी येथे देखील वृक्षारोपण व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. दि. 01 ऑगस्ट रोजी एक मुल -एक झाड, एक व्यक्ती- एक झाड या उक्तीप्रमाणे केशर आंबा कलमे रोपांचे जिल्हा परिषद शाळेतील सर्व मुलांना व ग्रामस्थांना वाटप करण्यात आले. प्रतिनिधिक स्वरूपात 10 विद्यार्थी व 30 ग्रामस्थ यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. नंतर सर्व ग्रामस्थांना प्रत्येकी एक झाड देण्यात आले. झाडांची लागवड व संगोपन कसे करावे याविषयी वॉटर संस्थेचे ईनुस शेख सर यांनी माहिती दिली. यावेळी सर्व मराठा सेवक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. दि. 3 ऑगस्ट रोजी मनोज दादा जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा तांबाराजुरी येथे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरामध्ये सर्व जाती धर्माच्या लोकांनी सहभाग घेतला व आपले रक्तदान केले. तरुणांमध्ये प्रचंड उत्साह होता. या रक्तदान शिबिरामध्ये एकूण 35 तरुणांनी आपले रक्तदान केले. विशेष म्हणजे या शिबिरामध्ये जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा कर्मचारी रहाटे मॅडम यांनीही रक्तदान केले.



मनोज दादा जरांगे पाटील हे नेहमी सांगत असतात की गाव गाड्यातील मराठा समाज, ओबीसी समाज, दलित समाज, सर्व एकजुटीने वागतो, एकमेकांना सहकार्य करतो अगदी त्याचप्रमाणे या रक्तदान शिबिरामध्ये गावातील सर्व जाती धर्मातील युवकांनी आपले रक्तदान केले. या रक्तदान शिबिरासाठी बीड ब्लड सेंटरचे बिराजदार सर आणि त्यांचे कर्मचारी यांनी सहकार्य केले. उपस्थित सर्व कर्मचारी यांना हरिदास तांबे यांच्याकडून जेवणाची सोय करण्यात आली होती. सर्व रक्तदात्यांना केळी, बिस्किट व ग्लुकोज भागवत तांबे यांच्याकडून वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नागझरी सेवाभावी संस्थेचे लक्ष्मण तांबे सर, एसएससी फाउंडेशन चे अध्यक्ष नवनाथ तांबे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष बबन पवार सर, मराठा समाजसेवक केशव तांबे,गणेश तांबे ग्रामपंचायत सदस्य, आदी सकल मराठा समाजाचे युवक व ग्रामस्थ यांनी सहकार्य केले. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे 35 तरुणाने आपली रक्तदान करून हे शिबिर यशस्वी केले.

# पत्रकार सचिन पवार यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव!

## खासदार बजरंग सोनवणे, आजी-माझी आमदार,भावी आमदार,सामाजिक कार्यकर्ते, नेतेमंडळी, मित्र परिवाराकडून शुभेच्छा

**पाटोदा | प्रतिनिधी**

अगदी अल्पावधी मध्ये आपल्या लेखणीतून सामाजिक कार्यातून वकृत्वातून सर्वांनाच भुरळ पाडणारे पत्रकार सचिन पवार यांचा तीन ऑगस्ट रोजी वाढदिवस संपन्न झाला. वाढदिवसाच्या निमित्ताने बीड जिल्ह्याचे नवनिर्वाचित खासदार बजरंग बप्पा सोनवणे, आजी-माजी आमदार, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, भावी आमदार यांच्यासह अनेक नेते मंडळींनी शुभेच्छांचा वर्षाव केला. पत्रकार सचिन पवार यांच्या कार्याचे कौतुक सर्व स्तरातून नेहमीच होत आले आहे. पत्रकारितेतून भ्रष्ट नेते, अधिकाऱ्यांना घाम फोडणारे, सर्वसामान्यांना न्याय मिळवून देणारे, सामाजिक कार्यकर्त्यांना ऊर्जा देणारे आणि सर्वांच्याच हक्काचे पत्रकार म्हणून सचिन पवार यांची ओळख आहे. त्याचबरोबर सामाजिक कार्यात देखील सर्वात आघाडीवर राहून सर्वसामान्यांना आपलंसं करत काम करणारे सचिन पवार म्हणून त्यांची ओळख आहे. मित्रांना खरा आणि हक्काचा मित्र म्हणून वाटणारे सुद्धा सचिन पवारच आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त राजकीय सामाजिक शैक्षणिक धार्मिक मराठा चळवळ अशा विविध क्षेत्रातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव मोठ्या प्रमाणात झालेला पाहायला मिळाला ही त्यांच्या कामाची पावतीच म्हणावी लागेल. इतकं प्रेम मिळवायला देखील



तितकं जिजाऊ लागतं हेच सचिन पवार यांनी त्यांच्या लोकप्रियतेतून दाखवून दिले आहे. 3 ऑगस्ट म्हटलं की हक्काच्या पत्रकाराचा वाढदिवस असंच बोललं जातं आणि त्यांच्या वाढदिवसानिमित्त बीड जिल्ह्याचे नवनिर्वाचित खासदार बजरंग बाप्पा सोनवणे, संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे अगदी जवळचे सहकारी मराठा सेवक किशोर आप्पा पिंगळे, सहकार महर्षी रामकृष्ण बांगर साहेब, डीसीसी संचालिका सौ.सत्यभामाताई बांगर, जिल्हा परिषद सदस्य सतीश आबा शिंदे, राष्ट्रवादी युवक प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख, मराठा सेवक अशोक पोकळे, राजमुद्रा जिल्हाध्यक्ष बाळासाहेब लोखंडे, किशोर काकडे, पाटोदा नगराध्यक्ष राजू जाधव,राजमुद्राचे मार्गदर्शक सुरेश शेळके, मराठा सेवक सुरेंद्र तिपटे, आर्यन फाउंडेशनचे राम फाळके, सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष दीपक घुमरे, शिरूरचे सहकारी जीवन कदम, भाई विष्णुपंत घोलप, मराठा सेवक बाळासाहेब शिंदे, भारतीय जनता पार्टीचे भाऊसाहेब भवर, संजय शेळके सर, संतोष पवार, अखिल भारतीय मराठा महासंघाचे प्रदेशाध्यक्ष बन्सी दादा डोके, मराठा सेवक आर आर येवले, युवा नेते महेश आजबे, पत्रकार अशोक भवर, अण्णासाहेब लवांडे, सरपंच किशोर जेधे, सरपंच संजय खोटे, अर्जुन आबा पवार, मराठा सेवक गजानन बेद्रे सर, बंधू रंजीत पिंगळे, शिवसेनाप्रमुख मुकुंद शिंदे, विश्वास पवार, बाळासाहेब हलजुते, अक्षय पवार, दादा पवार, रवी पवार, रामहरी पवार, लहू पवार, वसंत पवार,बालाजी पवार, उमेश पवार,यांच्यासह सामाजिक राजकीय धार्मिक शैक्षणिक पत्रकारिता क्षेत्रातील सर्वच नेतेमंडळी कार्यकर्ते मित्र परिवाराकडून शुभेच्छांचा वर्षाव झाला आहे.

### खासदारापासून सर्वसामान्यांनी दिल्या शुभेच्छा!

पत्रकार सचिन पवार यांच्या वाढदिवसानिमित्त खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्यापासून सर्वसामान्य जनतेने दिल्या शुभेच्छा. तीन ऑगस्ट रोजी पत्रकार सचिन पवार यांचा वाढदिवस असल्याने सर्वांनाच आपल्या हक्काचे पत्रकार वाटणारे आणि सर्वांच्या हाकेला धावून जाणारे पत्रकार म्हणून सचिन पवार यांची ओळख आज जिल्हाभरामध्ये झाली आहे. कोणीही आपली एखादी बातमी घेऊन त्यांच्याकडे गेलं की नक्कीच प्रकाशित होते आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी ते लिहीतात याचा सर्वसामान्य जनतेला नेत्यांना समाधान आहेच म्हणूनच त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव आपल्याला पाहायला मिळतो...

# हट्टावर कायम राहिल्यास नाशिक मध्ये काळे झेंडे दाखवू

## ओबीसी समाजाचा मनोज जरांगेंना थेट इशारा.

**नाशिक/सुरेश इंगळे**

मराठा आरक्षणाबाबत लढा देणारे मनोज जरांगे पाटील यांच्या शांतता रॅलीचा समारोप १३ ऑगस्टला नाशिक मध्ये होणार असल्याने , त्या पार्श्वभूमीवर ओबीसीतून आरक्षण मागण्याचा जरांगे पाटील यांनी हट्ट सोडल्यास त्यांचे आम्ही स्वागत करू ,मात्र ते आपल्या हट्टावर कायम राहिल्यास त्यांना १३ ऑगस्ट रोजी नाशकात काळे झेंडे दाखवले जातील, असा इशारा ओबीसी सुवर्णकार समितीचे प्रदेशाध्यक्ष गजू घोडके यांनी एका निवेदनाद्वारे दिला आहे.

निवेदनामध्ये म्हटले आहे की ओबीसीच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण मिळावे अशी सुरुवातीला मराठा आंदोलकाची मागणी होती, मात्र ओबीसीतूनच आम्हाला



आरक्षण मिळावे असा हट्ट जरांगे पाटील यांनी धरल्याने आरक्षणाच्या मुद्द्याला नाहक खतपाणी मिळाले आहे. ओबीसी समाजाला महा कष्टाने आरक्षण मिळाले आहे, त्यासाठी कित्येक वर्षे संघर्ष करावा लागला, परंतु ओबीसीच्या ताटातलेच आरक्षण आम्हाला हवे आणि त्यासाठी दमबाजी, मी पाया पाडेल, त्याला पाडेल, अशा वंदना करून व समंग प्रसिद्धी मिळणे कितपत योग्य आहे ?प्रत्येकाचा एकेरी उल्लेख करणे खालच्या पातळीवर ऊतरुण बोलणे पितृतुल्य व्यक्तींचा आधार न बाळगणे हे जरांगे पाटला सारख्या मराठा नेत्याला निश्चितच अशोभनीय आहे .महाराष्ट्र शासनाने मराठा समाजास आरक्षण देण्याची घोषणा केल्यानंतरही सातत्याने आंदोलनाची नौटंकी करणे, सरकारला धमक्या देणे कितपत उचित आहे, याचे आत्मपरीक्षण म्हणून जरांगे पाटलांनी करावे. केवळ विशाल मोर्चे काढून आणि दमबाजीचे राजकारण करून आरक्षण मिळत नसते, त्यासाठी कायदेशीर लढाईच आवश्यक असते. ओबीसीतूनच मराठा समाजास आरक्षण देण्याची मागणी खऱ्या ओबीसीवर अन्याय करणारे असल्याने आम्ही ओबीसी बांधव त्यांच्या सातत्याने निषेध करीत राहू ,ओबीसीतूनच आम्हाला आरक्षण मिळावे हा हट्ट त्यांनी सोडल्यास १३ ऑगस्टला त्यांचे नाशकात स्वागत केले जाईल. मात्र आपल्या हट्टाला ते चिटकून राहिल्यास त्यांना ओबीसी तर्फे काळे झेंडे दाखविले जातील. तसेच त्या दिवशी प्रत्येक ओबीसी बांधव आपल्या घरावर काळी गुढी उभारेल, असा इशाराही गजू घोडके यांनी या निवेदनात दिला आहे.

## मुंगशी ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच सदस्य यांच्याकडून अक्षय ताकमोगे यांचा सत्कार

**सोलापूर प्रतिनिधी**

पोलीस उपनिरीक्षक परीक्षेत अक्षय संतोष ताकमोगे हे उत्तीर्ण झाल्याबद्दल दिनांक ०५/०८/२०२४ रोजी मुंगशी येथे मुंगशी ग्रामपंचायत सरपंच प्रतिनिधी सूर्यकांत राजाराम महाडिक, उपसरपंच शंकर चंद्रकांत काळे ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ यांच्याकडून शाल सिर्फ फेटा घालून सत्कार करण्यात आला. यावेळी



उपस्थित सरपंच प्रतिनिधी सूर्यकांत महाडिक ग्रामपंचायत सदस्य नागेश जगताप, मारुती जगताप,भीमराव गावले, सागर लोंढे, माजी सरपंच किरण मोरे, उद्धव गावले, गुंडाराज निंबाळकर (महाराज) मारुती काळे, विष्णू गावले, दादा पाटील, विकास मोरे, निखिल महाडिक,विशाल दानाने, व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

## हिंदू जनजागृती समितीच्या वतीने उरण येथे हिंदू युवतींसाठी शौर्य प्रशिक्षण शिबिर संपन्न !

### धर्मशिक्षण आणि स्वरक्षा प्रशिक्षण घेऊन सक्षम होण्याचा युवतींचा निर्धार !

**उरण प्रतिनिधी**

भारतात तसेच महाराष्ट्र राज्यातही सध्या अनेक युवती ‘लव्ह जिहाद’ला मोठया प्रमाणात बळी पड़त आहेत. अशाच एका ‘लव्ह जिहाद’च्या प्रकरणात नुकतीच उरण येथील कु.यशश्री शिंदे (वय २२) हिची अत्यंत क्रूरतेने आणि मानवतेला काळीमा फासणारी हत्या करण्यात आली. ‘लव्ह जिहाद’च्या या संकटासह युवती आणि महिलांवर होणारे अन्याय-अत्याचाराचे प्रसंग पाहता त्याला सामोरे जाण्यासाठी त्यांचे




शारीरिक, मानसिक तसेच आध्यात्मिक बळ वाढणे आवश्यक आहे. हा उद्देश लक्षात घेऊन हिंदु जनजागृती समितीच्या वतीने उरण शहरातील गणपती चौक येथील श्रीराम मंदिर सभागृहात हिंदू युवतींसाठी आयोजित केलेले शौर्य प्रशिक्षण शिबिर उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

या शौर्य प्रशिक्षण शिबिरामध्ये कराटे, दंडसाखळी प्रशिक्षण आणि स्वसंरक्षणाच्या सोप्या पद्धती शिकवल्या गेल्या. ‘अन्याय, अत्याचारांविरोधात लढण्यासाठी युवतींनी शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक दृष्टीने सक्षम होणे गरजेचे आहे,’ असे आवाहन यावेळी सनातन संस्थेच्या धनश्री केळशीकर यांनी केले. यावेळी उपस्थित युवतींनी धर्मशिक्षण घेण्यासह स्वरक्षा प्रशिक्षण घेऊन सक्षम होण्याचा निर्धार व्यक्त केला. या शिबिरात अनेक युवतींनी उत्स्फूर्तपणे मनोगत व्यक्त करून हा स्तुत्य उपक्रम राबविल्याबद्दल हिंदू जनजागृती समितीचे आभार व्यक्त केले.

# १ ऑगस्टपर्यंत २७,०५,२१० कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी- मराठा नोंदी प्रशासनाने तपासल्या

बीड, दि. 05, : कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी - मराठा यांच्या 1 ऑगस्ट 2024 पर्यंत बीड जिल्हा प्रशासनाकडून एकूण 27,05,210 नोंद तपासण्यात आलेल्या आहेत. जिल्हा प्रशासनाने 24 ऑक्टोबर 2023 पासून 1 ऑगस्टपर्यंत एकूण 27,05,210, नोंदी तपासण्यात आल्या. जिल्हयामध्ये 21,907 आतापर्यंत एकूण कुणबी नोंदी सापडल्या. जिल्हयात 521 गांवामध्ये कुणबी नोंदी सापडल्या. त्यापैकी 467 गांवाची संख्या प्रसद्धि करण्यात आलेली आहे. बीड तालुक्याची कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा बाबतच्या नोंदी खालील प्रमाणे

बीड तालुक्यात तपासलेल्या नोंदींची एकूण संख्या 3,92,217, एकुण कुणबी नोंदींची संख्या 3061, कुणबी नोंद सापडलेल्या गावांची संख्या 98, त्यापैकी यादी प्रसिद्ध केलेल्या गावांची संख्या 98 इतकी आहे.

गेवराई तालुक्यात तपासलेल्या नोंदींची संख्या 3,28,014, एकुण कुणबी नोंदींची संख्या 4375, कुणबी नोंद सापडल्या गावांची संख्या 122, त्यापैकी यादी प्रसिद्ध केलेल्या गावांची संख्या 122 इतकी आहे.

शिरूर-कासार तालुक्यातील तपासलेल्या नोंदींची संख्या 1,17,629 एकुण कुणबी नोंदींची संख्या 352 कुणबी नोंद सापडल्या गावांची संख्या 15, त्यापैकी यादी प्रसिद्ध केलेल्या गावांची संख्या 14 इतकी आहे.

पाटोदा तालुक्यात तपासलेल्या नोंदींची संख्या 1,34,651 एकुण कुणबी नोंदींची संख्या 906, कुणबी नोंद सापडलेल्या गावांची संख्या 22, त्यापैकी यादी प्रसिद्ध केलेल्या गावांची संख्या 22 इतकी आहे.

आष्टी तालुक्यातील तपासलेल्या नोंदींची संख्या 2,99,106, कुणबी नोंदींची संख्या 5199, कुणबी नोंद सापडलेल्या गावांची संख्या 60, त्यापैकी यादी प्रसिद्ध केलेल्या गावांची संख्या 32 येवढी आहे.

माजलगाव तालुक्यातील तपासलेल्या नोंदींची संख्या 4,00,213, एकूण कुणबी नोंदीची संख्या 2200, कुणबी नोंद सापडलेला गावांची संख्या 51, त्यापैकी यादी प्रसिद्ध केलेल्या गावांची संख्या 56 इतकी आहे.

धारूर तालुक्यातील तपासलेल्या नोंदींची संख्या 1,88,374, एकुण कुणबी नोंदींची संख्या 817, कुणबी नोंद सापडलेला गावाची संख्या 23, त्यापैकी यादी प्रसिद्ध केलेल्या गावांची संख्या 10 इतकी आहे.

वडवणी तालुक्यातील तपासलेल्या नोंदींची संख्या 78,255 एकूण कुणबी नोंदींची संख्या 1032, कुणबी नोंद सापडलेल्या गावांची संख्या 31, त्यापैकी यादी प्रसिद्ध केलेल्या गावांची संख्या 18 इतकी आहे.

अंबाजोगाई तालुक्यातील तपासलेल्या नोंदींची संख्या 1,01,390, एकूण कुणबी नोंदींची संख्या 716, कुणबी नोंद सापडलेल्या गावांची संख्या 26, त्यापैकी यादी प्रसिद्ध केल्या गावांची संख्या 25 इतकी आहे.

केज तालुक्यातील तपासलेल्या नोंदींची संख्या 3,50,078 एकूण कुणबी नोंदींची संख्या 2630, कुणबी नोंद सापडलेल्या गावांची संख्या 55, त्यापैकी यादी प्रसिद्ध केलेल्या गावांची संख्या 54 इतकी आहे.

परळी तालुक्यातील तपासलेल्या नोंदींची संख्या 3,15,283, एकूण कुणबी नोंदींची संख्या 619, कुणबी नोंद सापडलेल्या गावांची संख्या 18, त्यापैकी यादी प्रसिद्ध केलेल्या गावांची संख्या 16 केलेली आहे.

24 ऑक्टोबर 2023 पासून कुणबी, कुणबी-मराठा व मराठा कुणबी जात प्रमाणपत्रांच्या तपशीलानुसार 10,6,336 जात प्रमाणपत्रांची अर्जांची संख्या असून आतपर्यंत 98173 नागरीकांना जात प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आलेले आहेत. 57 नामंजूर अर्ज असून 8106 इतके प्रलंबित अर्ज आहेत. प्रलंबित अर्जांपैकी 4381 अर्ज त्रुटीमध्ये आहेत. प्रलंबित व त्रुटी अर्जांवर कार्यवाही करण्याची दक्षात घेण्यात येत आहे. यासंदर्भातील तालुका निहाय माहिती खालील प्रमाणे दिली आहे.

बीड तालुक्यात जात प्रमाणपत्र अर्ज संख्या 22,389 असून निर्गमीत जात प्रमाणपत्र संख्या 18,786, नामंजूर अर्ज संख्या एकही नाही, प्रलंबित अर्जाची संख्या 3603 इतकी आहे.

गेवराई तालुक्यात जात प्रमाणपत्र अर्ज संख्या 18,570, निर्गमीत जात प्रमाणपत्र संख्या 16,059, नामंजूर संख्या एकही नाही, प्रलंबित अर्जाची संख्या 2511 इतकी आहे.

शिरूर कासार तालुक्यात जात प्रमाणपत्र अर्ज संख्या 6056, निर्गमीत जात प्रमाणपत्र संख्या 5359, नामंजुर अर्ज संख्या एकही नाही. प्रलंबित अर्जाची संख्या 697 इतकी आहे.

पाटोदा तालुक्यात जात प्रमाणपत्र संख्या 10,457, निर्गमित जात प्रमाणपत्र संख्या 10,266, नामंजूर अर्ज संख्या 27, प्रलंबित अर्जाची संख्या 164 इतकी आहे.

आष्टी तालुक्यात जात प्रमाणपत्र अर्ज संख्या 14,944, निर्गमीत जात प्रमाणपत्र संख्या 14,831, नामंजुर अर्ज संख्या 20, प्रलंबित अर्जाची संख्या 93 इतकी आहे.

माजलगाव तालुक्यातील जात प्रमाणपत्र संख्या 6360, निर्गमित जात प्रमाणपत्र संख्या 6068, नामंजुर अर्ज संख्या 2, प्रलंबित अर्ज संख्या 290 इतकी आहे.

धारूर तालुक्यातील जात प्रमाणपत्र संख्या 4211, निर्गमीत जात प्रमाणपत्र संख्या 3966, नामंजूर अर्ज संख्या एकही नाही, प्रलंबित अर्जाची संख्या 245 इतकी आहे.

वडवणी तालुक्यातील जात प्रमाणपत्र अर्ज संख्या 4170, निर्गमीत जात प्रमाणपत्र संख्या 3925, नामंजूर अर्ज संख्या एकही नाही प्रलंबित अर्ज संख्या 245 इतकी आहे.

अंबाजोगाई तालुक्यातील जात प्रमाणपत्र अर्ज संख्या 5840, निर्गमीत जात प्रमाणपत्र संख्या 5769, नामंजुर संख्या एकही नाही, प्रलंबित अर्जाची संख्या 71 इतकी आहे.

केज तालुक्यातील जात प्रमाणपत्र संख्या 12570, निर्गमीत जात प्रमाणपत्र संख्या 12,486, नामंजूर अर्ज संख्या एकही नाही, प्रलंबित अर्ज संख्या 103 इतकी आहे.

परळी तालुक्यातील जात प्रमाणपत्र संख्या 769, निर्गमित जात प्रमाणपत्र संख्या 658, नामंजूर अर्ज संख्या 8, प्रलंबित अर्ज संख्या 103 इतकी आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077